**CNR No.MHLA**090025842023

## निशाणी ५ खालील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. **वादीच्या प्रस्तुत अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे:**

वादी व प्रतिवादी हे मौजे हंडरगुळी, ता.उदगीर येथील रहिवाशी आहेत. प्रतिवादी क्र.१ व २ हे विनापरवाना सावकारी करतात. प्रतिवादी क्र.३ हा बेकायदेशीर पणे प्रतिवादी क्र.१ कडून मौजे हंडरगुळी, ता.उदगीर येथील जमीन गट क्र./सर्वे नं.३४/३ पैकी क्षेत्र ०हे २०आर आकार रु.०–७१ पैसे दि.०६/१०/२०१७ रोजी दुय्यम निबंधक, उदगीर येथे नोंदणीकृत खरेदीखत अ.क्र.४८४४/२०१७ केलेले आहे. सदरी खरेदीखत हे नाममात्र असून प्रतिवादी क्र.१ च्या नावे प्रतिवादी क्र.२ हा विना परवाना सावकारी मध्ये करून घेतलेले आहे. सदरी खरेदीखत चार वर्षाच्या आत प्रतिवादी क्र.१ व २ ला वादी घेतलेली रक्कम परत केली नंतर परत करून देण्याचे गंगाधर माधवराव धुपे, शेकर पि.भरत शेळके, बालाजी दिगंबर उडतकेर, नागोराव साधू भोसले यांचे समक्ष ठरलेले होते. सदरी जमिनीचा ताबा आजतागायत वादीचाच आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र.१ व २ कडून घेतलेली रुपये दोन लाख रक्कम दि.२०/०३/२०२१ रोजी परत केलेली आहे. तसेच दोन लाख रुपयांचा धनादेश ग्रामीण बँक शाखा हंडरगुळीचा धनादेश वादीने दिलेला आहे. सददी चेकची रक्कम प्रतिवादी क्र.१ व २ यांनी उचलून घेतलेली आहे. वादी हा प्रतिवादी क्र.१ व२ ची

व्याजासकट रक्कम परत केलेली असताना प्रतिवादी क्र.१ व २ हे वादीकडे र.रु.१,१०,०००/– देणे आहे म्हणून परत खरेदीखत करून देत नाही. प्रतिवादी क्र.१ व २ च्या घरी दि.२०/०३/२०२१ रोजी झालेल्या बैठकीत वादीस परत खरेदीखत करून देणेचे ठरलेले असताना करून देणेस इन्कार करीत आहे व सदर जमीन प्रतिवादी क्र.१ व २ हे प्रतिवादी क्र.३ ला बेकायदेशीरपणे खरेदीखत दि.२६/१२/२०२० रोजी वादीस माहिती नसतांना करून दिलेले आहे. सदर खरेदीखत वादीवर बंधनकारक नाही. सदर खरेदीखत अ.क्र.५७३९/२०२० आहे. वादीने पंचासमक्ष प्रतिवादींना दि.०१/०४/२०२३ रोजी विचारले असता प्रतिवादीने नाममात्र खरेदीखत करून देणेस इन्कार केलेले आहे.

३. वादीने पुढे असे कथन केले आहे की, वादीने प्रतिवादी क्र.१ व २ यांना दि.१३/०४/२०२३ रोजी विधिज्ञांमार्फत नोटीस देखील पाठवलेली आहे. सदर नोटीस प्रतिवादी क्र.१ व २ ला मिळालेली आहे पण अद्याप त्यांनी उत्तर दिलेले नाही. प्रतिवादी क्र.३ यांनी देखील खरेदीखत करून देणेस इन्कार केला आहे. वादीने दाव्यासोबत दाखल कागदपत्राच्या यादीसह पोष्टाची पावती, ७/१२ व इतर कागदपत्र जोडलेले आहे. वादीने आपली केस सकृतदर्शनी सिध्द केलेली आहे. म्हणून, वादी यांनी सदरचा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला आहे.

४. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी सदरच्या दाव्यात नि.क्र.२५ वर त्यांचे म्हणणे दाखल करून दाव्यातील सर्व कथने स्पष्टपणे नाकारली आहेत व पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादींनी नाममात्र खरेदीखत वादीस परत करून देण्यास दि.१३/०४/२०२३ रोजी पंचासमक्ष इन्कार केल्यामुळे हेच दावा देण्याचे कारण घडल्याचे कथन खोटे आहे. वादीने

सदरच्या दाव्यात नमूद केलेली तारीख ही काल्पनिक व खोटी आहे. तसेच वादी यांना सदर दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडले नाही. म्हणून वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

५. सदर अर्जातील कथनांच्या अवलोकनावरून खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले आहे. त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसासहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहेः–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय? | ..नकारार्थी |
| २ | वादीने अनुकूलतेचा कल त्याच्या बाजूने असल्याचे सिध्द केले आहे काय ? | ..नकारार्थी |
| ३ | वादींना तुर्तातुर्त मनाई हुकूम नाकारल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे वादीने सिध्द केले आहे काय ? | ..नकारार्थी |
| ४ | काय आदेश ? ......अर्ज नामंजूर करण्यात येतो. | |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करिता:–**

**६.** मुद्या क्र. १ ते ३ एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळणेसाठी ते एकत्रितरित्या विचारात घेतले आहेत.

७. सदरचा अर्ज हा तुर्तातुर्त ताकीदीचा असल्यामूळे प्रकरणाच्या गुणदोषावर विस्तृतपणे उहापोह करणे जरुरी नाही. तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज विचारात घेत असताना प्रथमदर्शनी केस कोणाच्या बाजूने आहे व अर्ज नामंजूर केलेस कोणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल इतकी मर्यादीत

बाब विचारात घेणे जरुरीचे असते.

८. वादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ठ्यर्थ फेरीस्त नि.क्र.४/१ कडे नोटीसची प्रत दाखल केली आहे. परंतु, सदरची नोटीस ही प्रतिवादी यांना मिळाल्याबाबतचे कोणताही कागदोपत्री पुरावा वादी यांनी सदरच्या दाव्यात दाखल केले नाही. पुढे वादी यांनी फेरीस्त नि.क्र.४/२ कडे दावा मिळकतीचे खरेदीखत दाखल केले आहे. सदरच्या खरेदीखतामध्ये वादी यांनी दाव्यात केलेल्या कथनानुसार फेर खरेदीखताबाबत कोणताही मजकूर नमूद केले नसल्याचे स्पष्टपणे दिसून येते. पुढे वादी यांनी फेरीस्त नि.क्र.४/३ कडे प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.३ यांना दि.२६/१२/२०२० रोजी दावा मिळकत विक्री केल्याचे खरेदीदस्त दाखल केला आहे.

९. वादी यांनी सदरच्या दाव्यात दाखल केलेल्या कागदपत्रा आधरे ही बाब स्पष्ट होते की, सध्या दावा मिळकत प्रतिवादी क्र.३ संतोष उध्दव भोसले यांच्या नावे असल्याचे दिसून येते. तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जावर विचार करतेवेळी सर्वोप्रथम दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस कोण आहे ही बाब लक्षात घेणे जरुरीचे असते. या प्रकरणात जरी वादी यांनी फेर खरेदीदस्ताबाबत त्यांच्या अर्जात कथन केले असले तरी त्यांनी सदरची बाब शबीत करण्याकरीता कोणताही कागदोपत्री व ठोस पुरावा या दाव्यात दाखल केला नाही. म्हणून वादी यांनी त्यांची केस प्रथमदर्शनी शाबीत केली नसल्याने व अनुकूलतेचा कल हा वादीच्या बाजूस नसल्याने वादी तुर्तातुर्त ताकीद मिळण्यास पात्र नाही. तसेच, जर वादी यांना तुर्तातुर्त ताकीद दिली नाही तर वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मुद्या <u>क्र.१ ते ३</u> चे उत्तर <u>नकारार्थी</u> देवून <u>मुद्या क्र.४</u> करीता खालील आदेश पारीत करीत

आहेः–

## आदेश

वादीचा **नि.५** कडील अर्ज नामंजूर करण्यात येते.

(आदेश खुल्या न्यायालयात सही करुन घोषित केला)

Digitally signed by JYOTIMALA C GUPTA
Date: 2024.06.14 16:22:44 +0530

**उदगीर** **(श्रीमती जे.सी.गुप्ता)**

**दिनांकः १३/०६/२०२४** **सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**

**उदगीर.**